# झाड फुलांचे दोस्त

काही मनं मुळातच हिरवी असतात, आपल्या परिसरासाठी, झाडा-फुलांसाठी काहीतरी करावं म्हणून ते राबत असतात.. पावसाळ्यात तर हिरवेच होतात त्यांचे हात.. ते डोंगरदऱ्या गाठतात, कुठं टेकड्या फुलवतात तर कुठं बी रुजवतात.. कोणी पर्यावरणासाठी जीवाचं रान करतं तर कुणी झोपेचं सोंग घेतलेल्यांना 'जागं' करत त्यांना निसर्गावर प्रेम करण्याचे धडे देतं, अशा माणसांची संख्या चार-दोन नाही, परस्परांच्या मदतीनं अनेक हात सरसावून कामाला लागलेले दिसतात त्या 'तरुण' हातांची ही भेट.. पावसाला भेटण्याचा एक खास रोमॅण्टिसिझम..







## ऑयकॉस
### 'देशी' जगण्याचा मंत्र

'ऑयकॉस' ही संस्था गेल्या अकरा वर्षांपासून पर्यावरण संवर्धन, जतन आणि पुनरुज्जीवन या क्षेत्रात सतत कार्यरत आहे. या कामामध्ये जमीनधारक, विकसक, शेतकऱ्यांपासून सामान्य माणसांपर्यंत सर्वांचाच सहभाग वाढावा यासाठी ही संस्था निरनिराळ्या सेवा पुरवते. विकासाच्या बदलत्या व्याख्येमुळे निसर्गावर येणारा ताण, त्यातून उद्भवणारे प्रश्न यासाठी त्यावर पर्यायी पर्यावरणीय व्यवस्था यावर या संस्थेनं विविध सेवा आखल्या आहेत. मोठ्या जमिनी, नवीन शहरं, फार्म हाऊस अशा प्रकल्पांमध्ये निसर्गाला अनुसरून आराखडे बनवणं, प्राणी-पक्ष्यांसाठी आसरे निर्माण करणं व त्यावबरोबरीनं तिथे असलेल्या नैसर्गिक संसाधनांचं योग्य व्यवस्थापन करणं ही प्रमुख सेवा आहे. याचबरोबरीनं स्थानिक वनस्पतींना प्राधान्य देऊन तेथील व्यवस्थापना केली जाते. एखाद्या प्रदेशात निसर्गतः आढळणाऱ्या वनस्पतींना 'स्थानिक' किंवा 'देशी' असं म्हटलं जातं. पक्षी, कीटक, फुलपाखरं तसेच इतर अनेक वन्यजिवांकरता या वनस्पती अन्न व आसरा पुरवतात. या वनस्पतींची माहिती होण्यासाठी 'ऑयकॉस'नं २००६ साली 'ग्रो नेटिव्हज' नावाची सीडी प्रकाशित केली. या सीडीमध्ये महाराष्ट्रातील ३०० स्थानिक वनस्पतींची माहिती त्यांच्या प्रदेशाप्रमाणे दिली गेली आहे. नुसती माहितीच नव्हे तर कोणत्या कारणांसाठी, कुठं या वनस्पती लावल्या जाऊ शकतात याच्यादेखील सूचना देण्यात आल्या आहेत.

नुसतीच झाडं लावण्याला फार अर्थ नाही, त्यापेक्षा आपली स्थानिक झाडं लावली तर ती पर्यावरणाला अनुकूल ठरतात. पक्षीही आपली घरटी त्यावर बांधतात. त्यासाठी हा ग्रो नेटिव्ह उपक्रम आहे.

तसेच यावर्षी पर्यावरण दिनानिमित्त लागवडीकरता स्थानिक वनस्पतींची पुस्तिका प्रकाशित करण्यात आली आहे. यामध्ये फुलणारी झाडं, सुवासिक वृक्ष, सावली देणारे वृक्ष, औषधी वृक्ष, फळ वृक्ष आणि झुडपं व जैविक कुंपण यामध्ये वर्गीकरण केलं गेलं आहे. त्याचबरोबर एखाद्या जमिनीवर मोठ्या प्रमाणात जर लागवड करायची असेल तर त्यासाठी वेगळी यादी दिली गेली आहे.

आपण झाडं लावणारच असू तर कोणती झाडं लावायची, आपली स्थानिक झाडं कोणती याची माहिती अनेकांना नसते. ती मिळाली तर स्थानिक झाडं जगतील आणि वाढतील..त्यासाठीचाच हा प्रयत्न.

**संपर्क**

**केतकी घाटे-मानसी करंदीकर**

http://www.oikos.in/
oikos@oikos.in